Added Sell.

ॲडीड सेल

तात्काळ

Internet Center वर उपलब्ध

-२५-

सन २०१७-१८ मधील निधी वितरणाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.१४/अर्थ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २०१७.

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. कृकमा ०६१७/प्र.क्र.१२७/२-स, दि. २८ जून, २०१७.

**परिपत्रक**

राज्याच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेल्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चासाठी निधी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना वर्षाच्या सुरुवातीस वितरीत करताना मागील वर्षाच्या खर्चाचा कल व वर्षभरामध्ये टप्प्याटप्प्याने प्राप्त होणारा महसूल तसेच वर्षभरात अचानक उद्भवणारा अनपेक्षित/तातडीचा खर्च याबाबी विचारात घेऊन खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात येते, त्याअनुषंगाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चाच्या अर्थसंकल्पीय तरतूदी प्रथम नऊमाही करीता (डिसेंबर-२०१७ अखेर) खर्चाची मर्यादा निश्चित करुन वरील दि.१८ एप्रिल, २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

२. राज्य शासनाने वाचा येथील अ.क्र.२ मधील शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारच्या कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना जाहीर केलेली आहे. सदर लाभ देण्यासाठी एकूण अंदाजे रु. ३४,०२२ कोटी एवढा खर्च होणे अपेक्षित आहे. तसेच नव्याने येऊ घातलेल्या वस्तू व सेवा विषयक कायदा (GST) मध्ये जकात कर, प्रवेश कर व स्थानिक स्वराज्य संस्था कर (LBT) विलीन झाल्याने महानगरपालिकांना साधारणत: प्रतीवर्षी रु. १३,००० कोटी भरपाई म्हणून राज्य शासनास द्यावे लागणार आहेत. हा खर्च प्राथम्याने करावयाचा असल्याने शासनाला अर्थसंकल्पित केलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवणे क्रमप्राप्त झाले आहे.

३. वरील निर्णयाच्या अनूषंगाने आता वाचा येथील अ.क्र.१ मधील शासन परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या निधी वितरणाच्या मर्यादेमध्ये बदल करण्यात येत असून प्रशासकीय विभागांना चालू वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी **महसूली लेख्यातील निधी ७०% तसेच भांडवली लेख्यातील निधी ८०%** इतक्या मर्यादेत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही मर्यादा आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या निधीसाठी लागू राहणार नाही. तसेच यापूर्वी प्रशासकीय विभागांनी वरील मर्यादेपेक्षा जादा वितरीत केलेला व प्रत्यक्ष खर्च न झालेला निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (बीम्स) प्रत्यार्पित करण्यात यावा. याव्यतिरिक्त केंद्र पुरस्कृत व बाह्य सहाय्यित योजनांच्या संदर्भात (राज्य हिश्श्यासह) निधी वितरणाबाबतची मर्यादा व त्याबाबतच्या सूचना वर नमूद वाचा येथील अ.क्र.१ मधील दि. १८ एप्रिल, २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार लागू राहतील.

४. प्रशासकीय विभागांनी उपरोक्त बाबींचा विचार करता खर्चाचे योग्य नियोजन करुन बांधील खर्चासाठी निधीचा प्राथम्याने विनियोग करावा. अनावश्यक अथवा काही कालावधीनंतर खर्च करता येण्यासारख्या बाबींवरील खर्च शक्यतो करु नये तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने यापूर्वी देण्यात आलेल्या सूचना व नव्याने करावयाची उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

**(१) (अ)सहायक अनुदाने (वेतनेतर) :-** विविध शासकीय/प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत. तसेच चालू आर्थिक वर्षात वितरीत अनुदानाचा ७५% विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोषागार अधिकाऱ्यांनी, सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर केलेल्या देयकासोबत संबंधित संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) ची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारित करु नये.

महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/ई-मेल द्वारे.

E - mail: swati .bane @ nic.in

क्रमांक :- कृषिवि-३७१७/प्र.क्र.४०/८अे

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : ११/०७/२०१७.

प्रति,

सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

विषय :- सन २०१७-१८ मधील निधी वितरणाबाबत (अनिवार्य / कार्यक्रम)
संदर्भ :- वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक - अर्थसं - २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७

महोदय,

संदर्भाधिन परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाबाबत सूचना निर्गमित केल्या असून चालू वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी महसूली लेख्यातील निधी ७०% व भांडवली लेख्यातील निधी ८०% इतक्या मर्यादेत उपलब्ध करुन दिला आहे. यापूर्वी या मर्यादेपेक्षा जादा वितरीत केलेला व प्रत्यक्ष खर्च न झालेला निधी BEAMS प्रणालीवर प्रत्यार्पित करण्यास सांगण्यात आले आहे. तरी याबाबत नोंद घ्यावी व परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी, ही विनंती. (संदर्भाधिन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे)

Comptroller

VC
12/7

सोबत : परिपत्रक.

आपली,

(भारती दि.धुरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

Inward No 906 Date 13 JUL 2017
B&T Section
Office of the Comptroller
Dr P D K V AKOLA

मा. कुलगुरू यांचे कार्या
आवक/जावक क्र. 417
दिनांक 12-7-17

प्रत,

L. C.A.O. Comptroller

महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
कुलगुरु / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
कुलगुरु / विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
कुलगुरु / विद्यापीठ अभियंता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
कुलगुरु / विद्यापीठ अभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
कार्यासन (८-अे), संग्रहार्थ).

**(आ) सहायक अनुदाने (वेतन)** :- शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरीत्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

**(२) संक्षिप्त देयक** :- अनेक वेळेला विभागांद्वारे संक्षिप्त देयकाव्दारे निधी खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात, तरी यापुढे विभागांनी ज्या लेखाशीर्षाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशिर्षाखालील निधी वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरित करु नये.

**(३) स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे यांना अनुदान** :- स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महामंडळे यांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणाऱ्या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या रकमा वसूल करुनच उर्वरित अनुदान वितरीत करण्यात यावे. तसेच शासनाद्वारे सदर संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग व अखर्चित रक्कम कुठे ठेवली आहे याबाबतची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यात यावी. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे. एखाद्या कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी अखर्चित असल्यास त्याच प्रयोजनासाठी चालू वर्षी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय निधी वितरीत करु नये.

**(४) वैयक्तिक लाभार्थ्यांचा कार्यक्रम** :- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाअंतर्गतची लाभार्थ्यांची देयके आहरित करतांना लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरित करण्यात येऊ नयेत. वैयक्तिक लाभार्थ्यांचे कार्यक्रम आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात यावीत.

**(५) शिष्यवृत्ती** :- शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी तसेच सवलती पोटी दिलेले अनुदान इत्यादीची प्रदाने इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टम (ECS )नेच अदा करण्यात यावीत. अशा सर्व बाबी आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात याव्यात.

**(६) बांधकाम विषयक प्रस्ताव** :- बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन कामनिहाय निधी अर्थसंकल्पित केल्याशिवाय विभागाने निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करु नये. तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांसाठी नियोजन/वित्त विभागाच्या सहमतीने निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यानंतरच निविदा सूचना काढाव्यात व निविदा सूचना काढल्याशिवाय काम करु नये व हा निधी ठेव बांधकामाचे स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करु नये.

**(७) खरेदी प्रक्रिया** :- सर्व मंत्रालयीन विभागांना असेही कळविण्यात येते की ,"शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका", उद्योग ,ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या क्र. भांखस - २०१४ / प्र.क्र.८२/ भाग-III / उद्योग-४, दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केली आहे. सदर शासन निर्णय व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे खरेदीप्रक्रिया पूर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय तसेच या मार्गदर्शक सूचनेतील अटींचे पालन करुन खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात यावीत. खरेदीविषयक धनादेश संबंधित पुरवठादाराच्याच नावाने व शक्यतो इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमद्वारे (ECS) अदा करण्यात यावेत.

**(८) अखर्चित रकमा** :- विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांनी त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते, ही एक प्रकारची अनियमिता आहे. याची विभागांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेला यापूर्वीचा अखर्चित निधी (स्वीय प्रपंजी खात्यातील / महामंडळाच्या खात्यातील वा इतर प्रकारे खर्च दर्शवून बाहेर ठेवण्यात

आलेला) संपूर्णतः खर्च झाल्याशिवाय तरतुदी आहरित वा वितरीत करु नयेत. याठिकाणी असेही निदर्शनास आणण्यात येते की, स्वीय प्रपंजी लेख्याखाली विभागांकडे बऱ्यांच मोठया प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचे दिसून येते. सदर निधीचा ताळमेळ घालून व लेखा परिक्षण करुन निधी विहीत मुदतीत खर्च न झाल्यास तो शासनाच्या तिजोरीत परत करण्यात यावा. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे.

(९) **पुनर्विनियोजन** :- विभागांमार्फत करण्यात येणारे खर्चाचे पुनर्विनियोजन कार्यक्रमावरील खर्चासाठी नियोजन व वित्त विभागाच्या व अनिवार्य खर्चासाठी वित्त विभागाच्या सहमतीने करण्यात यावे. केंद्र सहाय्यित/केंद्र पुरस्कृत कार्यक्रम यांच्या अनुषंगाने अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या राज्य हिश्श्याचा निधी इतरत्र पुनर्विनियोजित करण्यास अनुमती देण्यात येऊ नये.

(१०) **कार्यक्रमांची द्विरुक्ती** :- केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेऊन त्याच स्वरूपाचे राज्य कार्यक्रम केंद्र सहाय्यित कार्यक्रमांमध्ये विलिन करण्याची नियोजन विभागाने कार्यवाही करावी. तसेच अनिवार्य व कार्यक्रम यावरील खर्चातील सारख्याच बाबींचा आढावा घेण्याचे काम वित्त विभाग व नियोजन विभागामार्फत करण्यांत यावे. राज्यामध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेऊन फार मोठ्या कालावधीपासून सुरु असलेल्या कार्यक्रमांची उपयोगिता पाहून त्यांना मुदतवाढ द्यावी अथवा त्या ताबडतोब बंद कराव्यात.

(११) **मोटार वाहन खरेदी व इंधनावरील खर्च** :- सर्व विभागांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वाहनांचा यथोचित वापर करून नवीन वाहन खरेदीचे प्रस्ताव सादर करु नयेत. तसेच इंधनावरील खर्चात बचत करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

(१२) **कार्यालयीन खर्चात बचत** :- कार्यालयीन कामकाज करताना कागद, वीज, पाणी, प्रिंटरचे टोनर, स्टेशनरी, दूरध्वनी इ. चा वापर काटकसरीने करावा. शक्यतो छायाप्रती न काढता, स्कॅनिंग करून कागदाचा अपव्यय टाळावा. कार्यालयांचे नुतनीकरण, त्यामध्ये वातानुकूलित यंत्रणा बसविणे, इत्यादी कामे तूर्तास टाळावीत.

(१३) **प्रवास खर्च** :- शासकीय अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था यांमधील अधिकारी यांनी अनुज्ञेय असल्यासच विमान प्रवास करावा. मात्र सदर खर्चामध्ये काटकसर करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका आयोजित कराव्यात, जेणेकरुन अनावश्यक प्रवास टाळता येईल. फक्त अपवादात्मक परिस्थितीमध्ये अनुज्ञेय नसलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना विमान प्रवासास परवानगी द्यावी. तसेच इतर प्रकारच्या प्रवास खर्चामध्ये बचत करण्यासाठी अनावश्यक दौरे टाळावेत, आवश्यकतेपेक्षा जास्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रवासाची परवानगी देऊ नये व व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका आयोजित कराव्यात.

सध्या वित्त विभागाच्या दि. ३.३.२०१० व २३.६.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव व त्याहून उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांना एक्झिक्युटिव्ह क्लासने विमान प्रवास अनुज्ञेय आहे. काटकसरीची उपाययोजना म्हणून तूर्तास प्रधान सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या एक्झिक्युटिव्ह क्लासने विमान प्रवासास तात्पूरती स्थगिती देण्यात यावी. तसेच अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिकऱ्यांनी स्वेच्छेने एक्झिक्युटिव्ह क्लासने विमान प्रवास टाळावा.

(१४) **प्रशिक्षण धोरण** :- फक्त शासनाने मान्यता दिलेल्या व अत्यंत आवश्यक असलेल्या प्रशिक्षण/अभ्यासक्रम यांचा विचार करण्यात यावा. विविध विभागांद्वारे राबविण्यात येत असलेले उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम या आर्थिक वर्षात उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या ७०% च्या मर्यादेत राबविण्यात यावेत.